# Reading Passage

युरोपात ग्रीस नावाचा लहानसा देश आहे. त्या देशात मॅसिडोनिया नावाचे छोटेसे राज्य होते. तेथील राजाचे नाव फिलिप. तो पराक्रमी होता. त्याने सर्व ग्रीस देश जिंकला. अलेक्झांडर उर्फ सिकंदर हा त्याचा मुलगा. राजपुत्र सिकंदर लहानपणापासून हुशार आणि पराक्रमी होता. वीस वर्षाचा असताना तो ग्रीस देशाचा राजा झाला. आपण सर्व जग जिंकावे, अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. राजगादीवर बसल्याबरोबर त्याने प्रचंड सैन्य बरोबर घेतले आणि आपल्या देशाबाहेर निघाला. त्याने अनेक देश जिंकले. इराण, अफगाणिस्तान हे देश जिंकून तो भारताच्या अगदी दाराशी येऊन पोचला. वाटेत जी जी राज्ये लागली ती सर्व त्याने जिंकून घेतली. सिकंदरचा सैन्यापुढे कोणाचा टिकाव लागला नाही. शेवटी आपले सैन्य घेऊन विजयी सिकंदर भारताच्या सीमेवर येऊन उभा राहिला.

प्रश्न:

१. युरोपातील लहान देशाचे नाव काय?

२. फिलिप राजाच्या मुलाचे नाव काय?

३. अलेक्झांडर राजाने कुठले देश जिंकले?

४. अलेक्झांडर वयाचा कितव्या वर्षी राजा झाला?

५. राजपुत्र अलेक्झांडर लहानपणापासून कसा होता?

## Reading Passage

## राजेंद्र सिंह एक महान पुरुष

राजस्थान म्हणजे वाळवंटी प्रदेश. इथे पडणारा पाऊस पुरेसा नाही. त्यामुळे इथे पाण्याचा कायम दुष्काळ पडलेला असतो. अशा या राजस्थानात नद्यांना, ओढ्यांना पाणी आणण्याचा चमत्कार राजेंद्र सिंह यांनी केला. त्यांनी तिथली झाडं- झुडपं फुलवली, तिथल्या माणसांचे जीवन फुलवले. राजेंद्र सिंह हे मूळचे राजस्थान मधले. त्यांच्या गावाचे नाव दौसा. राजेंद्र सिंह हा तिथल्या जमीनदाराचा मुलगा. घराणे मोठे असल्यामुळे त्याचं शिक्षण सुरळीत झालं. ते आयुर्वेदिक डॉक्टर झाले.

ते महाविद्यालयात शिकत असतानाची गोष्ट. त्यांच्या राजस्थान विश्वविद्यालाच्या जवळ एक मोठी झोपडपट्टी होती. या झोपडपट्टीला एकदा आग लागली. राजेंद्र सिंह आणि त्यांचे मित्र संकटात सापडलेल्या माणसांना मदत करायला गेले आणि प्रयत्न करून त्यांनी आग विझवली. आग विझली आणि मदत थांबली असं झालं नाही. पुढेही अनेक दिवस जेवढी मदत ते करू शकत तेव्हा त्यांनी केली. या घटनेमुळे त्यांना आयुष्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन मिळाला. इतरांसाठी काम करत राहण्याची सामाजिक जाणीव त्यांच्या मनात झाली, त्यातूनच त्यांनी मुलांसाठी एक रात्रशाळा स्थापन केली. त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या तरुणांना घेऊन " तरुण भारत संघ" या नावाचा एक गट राजेंद्र सिंह यांनी स्थापन केला.

प्रश्न:

१. राजेंद्र सिंह यांचे मूळ गाव कोणते?

२. राजेंद्र सिंह कोणत्या विषयाचे डॉक्टर होते?

३. राजस्थान हा कुठला प्रदेश म्हणून ओळखला जातो?

४. राजेंद्र सिंह यांनी गरीब मुलांसाठी काय चालू केले?

५. राजेंद्र सिंह यांनी तरुणांसाठी कोणता गट स्थापन केला?

## Listening Passages
## कुत्रा - थेरपी डॉग

कुत्रा एक इमानदार प्राणी पाळीव प्राणी आहे. मनुष्य कुत्र्यांचा वापर राखण करण्यासाठी, शिकार करण्यासाठी, गुन्ह्यांच्या तपासासाठी तसेच सोबतीसाठी करतात. अनेक आजारांसाठी कुत्र्याचा उपयोग “थेरपी डॉग” म्हणून केला जातो. कारण कुत्रा मानसिक तणाव कमी करण्यास मदत करतो. रक्तदाबाचा त्रास, हृदयरोग आदींनी ग्रस्त मंडळीना कसे हाताळायचे, या करिता आता अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. अशा प्रशिक्षित कुत्र्यांना “थेरपी डॉग्ज” म्हणतात.

रंग, उंची, ठेवण व त्यांचे उपयोग यावरून जगात कुत्र्यांच्या जवळजवळ ४०० जाती पहावयास मिळतात. या विविध जातीच्या कुत्र्यांचे वजन ६०० ग्राम पासुन अगदी १०० किलोपर्यंतही असते. तर उंची ८ इंचापासून ४ फुटापर्यंत असते.

प्रश्न:

१. कुत्रा प्राणी काय म्हणून ओळखला जातो?
२. कुत्र्याचा उपयोग कुठला डॉग म्हणून करतात?
३. कुत्र्यांच्या किती प्रकारच्या जाती आहेत?
४. आजारी माणसे कुत्र्याची कशी मदत घेऊ शकतात?
५. कुत्रा कुठला तणाव कमी करण्यासाठी उपयोगी पडतो?

## Listening Passages

### पु. ल. देशपांडे

पु. ल. देशपांडे हे मराठीतील श्रेष्ठ विनोदी लेखक, नाटककार व बहुरूपी कलावंत म्हणून प्रसिद्ध होते. पु. ल. देशपांडे यांचे संपूर्ण नाव पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे असे होते. त्यांचा जन्म मुंबई येथे इ. स. १९१९ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण मुंबई व पुणे येथे झाले. विनोदांच्या प्रांतात त्यांनी स्वतःचे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले होते. तुझं आहे तुजपाशी हे नाटक अतिशय प्रसिद्ध होते.

पु. ल. देशपांडे यांनी मराठी चित्रपटसृष्टीतही नावलौकिक मिळवले होते. 'पुढचं पाऊल', 'गुळाचा गणपती', हे त्यांचे गाजलेले चित्रपट. त्यांचे 'व्यक्ती आणि वल्ली' पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता . मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्ष पदाचा मानही त्यांना मिळाला होता. भारत सरकारने "पद्मभूषण" हा किताब देऊन त्यांचा गौरव केला होता. तसेच ते मध्यप्रदेश शासनकडून दिल्या जाणाऱ्या कालिदास सन्मान चे ही मानकरी ठरले होते.

प्रश्न:

१. पु. ल. देशपांडे हे कोण होते?
२. पु. ल. देशपांडे यांचे पूर्ण नाव काय?
३. पु. ल. देशपांडे यांनी काय लिहिले?
४. पु. ल. देशपांडे यांचे कोणते चित्रपट गाजले?
५. पु. ल. देशपांडे यांना कोणते पुरस्कार मिळाले?